# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.07.2025** **वारःमंगळवार**

---

- ऑपरेशन सिंदूर ही सीमेपलिकडच्या दहशतवादाला उत्तर देण्याची नवी सुरुवात आहे, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन
- ऑपरेशन सिंदूर कोणत्याही दबावाखाली स्थगित केलेलं नाही संरक्षण मंत्र्यांचं स्पष्टीकरण
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला पाच वर्ष पूर्ण

आणि

- फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत दिव्या देशमुखनं पटकावलं अजिंक्यपद, राष्ट्रपती पंतप्रधानांसह अनेक मान्यवरांकडून दिव्याचं अभिनंदन

**<u>ऑपरेशनसिंदूर</u>**

ऑपरेशन सिंदूरबाबतच्या विशेष चर्चेला काल लोकसभेत सुरुवात झाली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं केलेली लष्करी कारवाई म्हणजे सीमेपलिकडच्या दहशतवादाला उत्तर देण्याची नवी सुरुवात आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर या चर्चेत भाग घेताना म्हणाले. दहशतवाद्यांना प्रॉक्सी समजलं जाणार नाही, सीमेपलिकडून होणाऱ्या दहशतवादाला चोख प्रत्युत्तर देणं, दहशतवाद आणि चर्चा एकाच वेळी शक्य नाही - केवळ दहशतवादाबाबत चर्चा होईल, भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना भीक घालणार नाही तसंच दहशतवाद सुरू असताना शेजारी देशांशी चांगेल संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत या पाच मुद्द्यांवर भारताचा दहशतवादाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आधारित आहे असं जयशंकर म्हणाले. ऑपरेशन सिंदूर स्थगित करण्यात कोणत्याही मध्यस्थ देशाचा हात नाही, अमेरिकेची यात कोणतीही भूमिका नाही असं सांगतानाच लष्करी कारवाई आणि सध्या सुरू असलेली व्यापाराबाबतची चर्चा यांचाही परस्परसंबंध नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

ऑपरेशन सिंदूर स्थगित केलं आहे, संपलेलं नाही; पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूरवरच्या विशेष चर्चेला प्रारंभ करताना ते काल बोलत होते.

**<u>---------- बाईट – राजनाथ सिंग १८ सेकंद -------------</u>**

ऑपरेशन सिंदूरचं उद्दिष्ट दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणं, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणं, आणि दहशतवादाबाबत भारताचं कठोर धोरण अधोरेखित करणं हे होतं, ऑपरेशन सिंदूरसाठी ठरवलेली राजकीय आणि लष्करी उद्दिष्टं पूर्ण झाल्यामुळे ही कारवाई थांबवली. कुणाच्या दबावामुळे शस्त्रसंधी केल्याचे आरोप पूर्णपणे चुकीचे आणि निराधार आहेत, असं त्यांनी स्पष्ट केलं.
जम्मू काश्मीरमध्ये ऑपरेशन महादेव सुरू आहे. पहलगाम हल्ल्यातला एक दहशतवादी यामध्ये मारला गेला असं केंद्रिय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी सांगितलं. पहलगाम हल्ल्यातले दहशतवादी अद्याप पकडले गेले नाहीत या विरोधकांच्या आरोपाला ते उत्तर देत होते.

संरक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणात खूप माहिती दिली, मात्र पहलगाममध्ये दहशतवादी कसे घुसले, २६ पर्यटकांना त्यांनी गोळ्या घालून कसं मारलं, याची माहिती त्यांच्या बोलण्यात आली नाही, अशी टीका काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी केली. तर, पहलगामध्ये पर्यटकांवर हल्ला करणारे दहशतवादी अद्याप पकडले न गेल्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी सरकारवर टीका केली.

या चर्चेत भाजपाचे अनुराग ठाकूर, तेजस्वी सूर्या, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, काँग्रेसचे दीपेंदर हुडा, एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी आणि अन्य नेते चर्चेत सहभागी झाले होते.

**<u>राज्यसभा</u>**

राज्यसभेत मात्र कालही विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आज सभागृहात ऑपरेशन सिंदूरबाबत चर्चा अपेक्षित आहे.

**<u>एनइपी</u>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्याला आज पाच वर्षं झाली. देशातल्या शाळांची एक इमारत ही ओळख बदलून केवळ पुस्तकी शिक्षण, गुण आणि पाठांतर यांच्यापलिकडील ज्ञान मिळवण्याचं अवकाश अशी ओळख घडवण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा हा पथदर्शी आराखडा आहे. गेल्या पाच वर्षात या धोरणामुळे अधिक समावेशक, विद्यार्थी केंद्रित आणि भविष्यासाठी अनुकूल शिक्षण पद्धतीचा पाया रचला गेला आहे. सर्व राज्यांमध्ये शिक्षण क्षेत्रात नवीन धोरणाचा प्रभाव दिसून येत आहे. निपुण भारत आणि विद्या प्रवेश या उपक्रमांचा ४ कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. बाल वाटिका, जादुई पिटारा आणि प्रशस्त ॲप या उपक्रमांमुळे बहुभाषिक, समावेशी आणि समग्र शिक्षणाला प्रोत्साहन मिळत आहे. मुली आणि विशेष गरज असलेल्या मुलांना मदत, भारतीय भाषांना प्रोत्साहन तसंच क्षेत्रिय विभाजन कमी करण्याचे प्रयत्न याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला आपलं ध्येय साध्य करण्याची संधी देणारं हे नवीन शैक्षणिक धोरण आहे.

**सर्वोच्चन्यायालय**

विशेष मतदार फेरपडताळणीनंतर निवडणूक आयोग बिहारमधील प्रारुप मतदार याद्या १ ऑगस्ट रोजी प्रकाशित करणार आहे. याला स्थगिती देण्याला काल सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. स्थगितीची मागणी करणाऱ्या याचिकेवरील सुनावणी शक्य तितक्या लवकर घेण्यात येईल असं आश्वासन न्यायालयानं दिलं.

**ॲपआधारितरिक्षा**

महाराष्ट्र सरकार ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी आणि ई बाईक सेवा सुरू करणार असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल सांगितलं. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर हे ॲप कार्यान्वित केलं जाईल. लवकरच हे ॲप तयार होईल. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा यात समावेश असेल; यामुळे राज्यातल्या लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध होईल, असं सरनाईक म्हणाले.

**बिहारबुद्धसंग्रहालय**

बिहारमधल्या बुद्ध सम्यक दर्शन संग्रहालय आणि स्मारक स्तूपाचं उद्घाटन मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते आज वैशालीगड इथं होणार आहे. भूकंपरोधी तंत्रज्ञान वापरुन बांधलेल्या या संपूर्ण दगडी बांधकामाचं प्रवेशद्वार बौद्धकालिन वास्तुरचनेचे सूक्ष्म तपशील दर्शवणारं आहे. संग्रहालयासह या संकुलात ध्यान केंद्र, ग्रंथालय, खुला रंगमंच आणि अन्य सुविधा उपलब्ध आहेत.

चीन, जपान, श्रीलंकेसह १५ देशांमधले बौद्ध भिक्कू उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**ट्रम्परशिया**

युक्रेनबरोबरचा संघर्ष रशियानं येत्या १२ दिवसांत थांबवावा असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. शांततेसाठी सुरू असलेल्या प्रयत्नात काहीच प्रगती दिसत नसल्यामुळे आता वाट पाहण्यात काहीच अर्थ नाही असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

दोन आठवड्यांपूर्वी ट्रम्प यांनी रशियाला युक्रेनबरोबरचा संघर्ष थांबवण्यासाठी ५० दिवसांची मुदत दिली होती.

**दिव्यादेशमुख**

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत नागपूरच्या दिव्या देशमुखने ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावलं आहे. जॉर्जियात बाटूमी इथं काल झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत टायब्रेक मध्ये दिव्याने भारताच्याच कोनेरू हंपीवर मात केली; हंपीला उपविजेतपद मिळालं. अंतिम फेरीचे पहिले दोन सामने आणि काल सकाळी झालेला तिसरा सामनाही अनिर्णित राहिला, मात्र काल दुपारनंतर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात कोनेरू हंपी हिच्यावर एका गुणानं मात करत दिव्यानं इतिहास रचला. या यशाबरोबरच दिव्यानं ग्रँडमास्टर हा किताबही मिळवला आहे.

दिव्याच्या या यशानंतर तिच्यावर देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्या आणि हंपीचं अभिनंदन केलं आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोन्ही बुद्धिबळपटू भारताच्या असणं हे भारतातल्या अपार प्रतिभेचं प्रतीक आहे, असं  राष्ट्रपतींनी नमूद केलं. तर दिव्याचं हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विविध केंद्रिय मंत्री तसंच महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही दिव्याचं आणि कोनेरू हंपीचं अभिनंदन केलं आहे.

**हवामान**

पूर्व राजस्थानसह, बिहार, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशच्या उत्तर भागात अतीवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अंदमान, निकोबार बेटं, बिहार, जम्मू काश्मीर, लडाख, पश्चिम बंगाल, झारखंड, सिक्कीम आणि ओडीशाच्या काही भागात वीजा आणि वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.